ePaper
वर्ष - 7 । अंक -52 | UDYAM-MH-26-0158827

# “शिंदे गटाने ‘जागतिक गद्दार दिन’ साजरा करावा”: आदित्य ठाकरे



महाईन्यूज ™
लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

ww enews | ।रविवार, दि. 18 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत

- पुणेकरांना पाणीटंचाईची भीती!
- ‘मोदी@9 जनसंपर्क
- सत्तेतील कुरघोडी!



# आता PCMC नको जिजाऊनगरच हवे!

## पिंपरी-चिंचवड शहर नामांतराचे फ्लेक्स पुन्हा लागले

**।पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड शहराचं नाव ‘जिजाऊ’नगर करावं या मागणीसाठी भक्ती-शक्ती प्रतिष्ठानने पुन्हा एकदा शहरभर फ्लेक्स लावले आहेत. आज राजमाता जिजाऊ यांची ३५० वी पुण्यतिथी असून या निमित्ताने भक्ती-शक्ती प्रतिष्ठानने ही मागणी केली आहे. पिंपरी-चिंचवडची ओळख ही अनेकदा ‘पीसीएमसी’ म्हणून करण्यात येत आहे. भविष्यात हेच नाव पडू शकतं हे लक्षात घेऊन शहराला ‘जिजाऊ’ नगर नाव द्यावं अशी मागणी भक्ती-शक्ती प्रतिष्ठानचे महेश बारणे यांनी केली आहे.**




### म्हणून पिंपरी-चिंचवडच नाव बदलून जिजाऊनगर करावं...

» मुंबईच बॉम्बे झालं त्याचप्रमाणे पिंपरी-चिंचवडच पीसीएमसी नाव होऊ नये. पीसीएमसी हे नाव इंग्रजी आहे. अनेकदा पिंपरी-चिंचवड हे नाव घेण्याचं टाळून व्यावसायिक किंवा परराज्यातील व्यक्ती पीसीएमसी हे नाव घेतात. यामुळे शहराच्या नावाची ओळख कमी होत असल्याचं म्हणणं महेश बारणे यांचं आहे. शहराचं नाव हे जिजाऊ नगर करण्यात यावं अशी त्यांची आग्रही भूमिका आहे.

काही दिवसांपूर्वीच भक्ती-शक्ती प्रतिष्ठानने पिंपरी-चिंचवड शहरात शेकडो फ्लेक्स लावत शहराच नाव ‘जिजाऊ’ नगर करण्यात यावं अशी मागणी केली होती. त्यानंतर आता पुन्हा एकदा राजमाता जिजाऊ यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून शहरभर ‘पीसीएमसी’ नको ‘जिजाऊ’ नगरच अशा आशयाचे फलक लावण्यात आले आहेत. यामुळे पुन्हा एकदा पिंपरी-चिंचवड शहराचा नामांतराचा विषय पुढे येत आहे. शहराला जिजाऊ नगर हे नाव देण्यात यावं अशी आग्रही भूमिका भक्ती-शक्ती प्रतिष्ठानने घेतली आहे. याकडे राजकीय नेते कसं बघतात आणि भविष्यात खरच पिंपरी-चिंचवड शहराचे नाव जिजाऊ नगर होणार का हे बघणं महत्त्वाचं आहे.

---

# पिंपरी चिंचवडकरांवर पाणी कपातीचे संकट?

## » पवना धरणात केवळ 20 टक्केच पाणीसाठा शिल्लक

**।पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी चिंचवड शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मावळ तालुक्यातील पवना धरणात जुलैअखेरपर्यंत पुरेल एवढा पाणीसाठा शिल्लक आहे. सध्या धरणात केवळ २०.२४ टक्के एवढा पाणीसाठा शिल्लक आहे. त्यामुळे, पिंपरी चिंचवडकरांनी पाण्याचा जपून वापर करावा, असे आवाहन महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने केले आहे.**

पिंपरी:पिंपरी-चिंचवड शहराला मावळातील पवना आणि आंद्रा धरणातून पाणीपुरवठा केला जातो. मात्र, पाणीपुरवठ्याच्या वाढत्या तक्रारींमुळे सर्व भागाला समान पाणीपुरवठा करण्यासाठी महापालिकेने २५ नोव्हेंबर २०१९ पासून एक दिवसाआड पाणीपुरवठा सुरू केला. साडेतीन वर्षांपासून दिवसाआड पाणीपुरवठा सुरू असून पाण्याच्या तक्रारींमध्ये मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. उंचावरील भागातील पाणीपुरवठा सुरळीत झाला. कमी दाबाने, पुरेशा पाणी येण्याच्या तक्रारी पूर्णपणे घटल्या आहेत.

महापालिका दिवसाला ५८० दशलक्ष लिटर (एमएलडी) पाणी पुरवठा करत आहे. सध्या पवना धरणात २०.२४ टक्के पाणीसाठा आहे. हा पाणीसाठा जुलैअखेरपर्यंत पुरेल एवढा आहे. गतवर्षी आजच्या तारखेला पवना धरणात २२.०६ टक्के पाणीसाठा होता. तर गतवर्षी पाणलोट क्षेत्रात २ हजार ७७७ मिमी पावसाची नोंद झाली होती.




त्यामुळे तीन वेळा धरण शंभर टक्के भरले होते. मात्र, गतवर्षीच्या तुलनेत यंदा कमी पाणीसाठा आहे. त्यामुळे पिंपरी चिंचवडकरांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन पाणीपुरवठा विभागाने केले आहे.

# पुण्यातील निवासी मालमत्तेच्या व्यावसायिक वापरावर नजर!

## » पुणे महा पालिकेने घेतली 'महावितरणा'ची मदत

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**महावितरण'कडून व्यावसायिक वीज 'मीटर' घेतले असेल आणि त्याच वेळी महापालिकेकडे रहिवासी दराने मिळकतकर आकारला गेला असेल, तर अशा मिळकतींना व्यावसायिक दराने मिळकतकराची आकारणी करण्यात येणार आहे. कमी मिळकतकर भरणाऱ्यांचा शोध घेण्यासाठी महापालिकेने 'महावितरण'ची मदत घेतली आहे. शहरातील काही लाख व्यावसायिक (कमर्शिअल मीटर) वीजग्राहकांची माहिती महापालिकेने मिळवली आहे. आता त्यांच्या मिळकतींना व्यावसायिक दरानेच मिळकतकर आकारला जातो की नाही, याची पाहणी करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.**






महापालिकेचे आयुक्त विक्रमकुमार यांनी ही माहिती दिली. महापालिकेने मिळकतकरातील गळती शोधण्यासाठी विविध उपाययोजना हाती घेतल्या आहेत. त्याअंतर्गत काही मिळकतींची प्रत्यक्ष जागेवर जाऊन पाहणी करण्यात आली. त्यामध्ये अनेक व्यावसायिक मिळकतींना रहिवासी दराने मिळकतकर आकारला जात असल्याचे समोर आले.

निवासी मालमत्तेचा व्यावसायिक वापर करायचा असल्यास महापालिकेकडे वापरात बदल अर्थात 'चेंज ऑफ यूझ' ची नोंद करावी लागते. त्यानुसार करआकारणीत बदल होतो.

मात्र, अनेक ठिकाणी हा बदल न करता व्यावसायिक वापर होत असल्याचे निष्पन्न झाले. त्यानंतर आता 'महावितरण'कडून त्यांच्या 'व्यावसायिक' (कमर्शिअल मीटर) ग्राहकांची माहिती संकलित करण्यात आली आहे.

पालिका प्रशासनाकडील आकडेवारीनुसार, २३ गावांसह बिगर निवासी मिळकतींची संख्या एक लाख ६० हजारांच्या घरात आहे. 'महावितरण'कडून सुमारे पावणेतीन लाख व्यावसायिक मीटर देण्यात आले आहेत. या दोन्ही आकड्यांमधील तफावत मिळकतकरातील गळती दर्शविणारी आहे. त्यामुळे पालिकेने यावर लक्ष केंद्रित केले आहे. ही पडताळणी पूर्ण झाली की, संबंधितांना नोटीस बजावण्यात येणार आहे.

### दोनशे कोटी जमा

**» मिळकतकरापोटी पालिकेकडे आतापर्यंत २०० कोटी रुपये जमा झाले आहेत. गेल्या वर्षी पहिल्या दोन महिन्यांत मिळकतकरापोटी चारशे कोटी रुपये जमा झाले होते. 'यंदाही पहिल्या दोन महिन्यांत ४०० कोटी रुपये मिळतील, अशी अपेक्षा आहे. लवकर मिळकतकर भरणाऱ्या नागरिकांसाठी प्रोत्साहन म्हणून लकी ड्रॉ योजनाही राबवली जात असल्याने नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळेल,' असे आयुक्तांनी सांगितले.**

> मिळकतकर महापालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्रोत आहे. त्यामुळे मिळकतकरातील गळती शोधण्यासाठी विविध उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. 'महावितरण'कडून मिळालेल्या माहितीची पडताळणी सुरू असून, त्यासाठी मिळकतकर विभागाला अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करून दिले जाईल.
>
> **- विक्रमकुमार,** महापालिका आयुक्त तथा प्रशासक

# पालखी सोहळ्यात चोरट्यांची चांदी!

## » सव्वा दोन लाख किंमतीचे दागिने गायब

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पालखी सोहळ्यात चोरीच्या आणखी चार घटना उघडकीस आल्या असून, या सर्व घटना वानवडी आणि हडपसर भागांत घडल्या आहेत. सुमारे सव्वादोन लाख रुपये किमतीच्या दागिन्यांवर चोरट्यांनी डल्ला मारला आहे.**



महंमदवाडी येथील महिला कुटुंबासह संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीच्या दर्शनासाठी पुणे-सोलापूर रस्त्यावरील फातिमानगर चौकात गेली होती. पालखीचे दर्शन घेत असताना चोरट्याने साठ हजार रुपयांचे मंगळसूत्र हिसकावले. या प्रकरणी वानवडी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस अंमलदार एस. के. कुंभार तपास करीत आहेत.

हांडेवाडी येथील महिला पतीसह संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीच्या दर्शनासाठी हडपसर येथील गोंधळेनगर कमानीजवळ गेली होती. दर्शन घेत असताना महिलेच्या गळ्यातील सोन्याचे साठ हजार रुपयांचे मंगळसूत्र चोरट्याने हिसकावले. या प्रकरणी हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिस अंमलदार एस. टी. पांडुळे तपास करीत आहेत.

हडपसर गाडीतळ येथे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीच्या दर्शनासाठी गेलेल्या तरुणाच्या गळ्यातील चाळीस हजार रुपयांची सोनसाखळी चोरट्याने चोरून नेली. या प्रकरणी महेश माळी (वय २८, रा. वडगाव शेरी) याने दिलेल्या तक्रारीनुसार हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# ठेकेदाराची अडवणूक करणं पडलं महागात

## » 'डेक्कन'चे दोन पोलिस कर्मचारी निलंबित

**। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।**



प्रभात रस्त्यावर काम करणाऱ्या ठेकेदाराची अडवणूक करणाऱ्या डेक्कन पोलिस ठाण्यातील दोन पोलिस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. शिपाई निखिल शेडगे आणि आकीब सत्तार शेख अशी पोलिस कर्मचाऱ्यांची नावे आहेत. पोलिस उपायुक्त संदीपसिंह गिल यांनी याबाबतचा आदेश दिला आहे.

### काय प्रकरण?

गेल्या महिन्यात पोलिस कर्मचारी शेडगे आणि शेख रात्रपाळीत गस्त घालत होते. प्रभात रस्त्यावर मध्यरात्री एकच्या सुमारास ठेकेदाराकडून रस्त्याचे काम करण्यात येत होते. शेडगे आणि शेख यांनी ठेकेदाराला अडवले. तुमच्याकडे मध्यरात्री काम करण्याची परवानगी आणि कार्य निविदा आहे का, अशी विचारणा केली. 'रस्त्यात खडी पडली आहे. गाड्या घसरतील,' असे दोघांनी ठेकेदाराला सांगितले. 'खडी बाजूला काढतो,' असे सांगून ठेकेदाराने त्यांना निविदा दाखविली. त्या वेळी शेडगे आणि शेख प्रभात रस्त्यावरील एका हॉटेलमध्ये गेले. तेथील एका कामगाराच्या मोबाइलवरून त्यांनी पोलिस नियंत्रण कक्षाशी संपर्क साधला. त्यानंतर ठेकेदाराला मध्यरात्री डेक्कन जिमखाना पोलिस ठाण्यात नेण्यात आले.

### चौकशीत शेडगे, शेख दोषी

घडलेल्या प्रकारानंतर ठेकेदाराने वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांकडे तक्रार दिली. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पोलिस नियंत्रण कक्षाला आलेल्या दूरध्वनीची चौकशी केली. तेव्हा दूरध्वनी एका हॉटेल कामगाराच्या नावावर असल्याचे आढळून आले. हॉटेल कामगाराची चौकशी केली तेव्हा त्याने शेडगे आणि शेख यांनी तक्रार दिल्याचे सांगितले.

# भक्ती शक्ती समुहशिल्पालगतची बिल्डरांना विक्री केलेली जागा

# कायमस्वरुपी शिवजयंतीसाठीच!

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदेः व्यापाऱ्यांसाठी पर्यायी जागा द्या

### 'पीएमआरडीए'चे आयुक्त राहुल महिवाल यांना आदेश

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**युगप्रवर्तक छत्रपती शिवाजी महाराज व लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती उत्सव साजरी होणारी भक्ती शक्ती समुहशिल्पालगतची बिल्डरांना विक्री केलेली जागा शिवजयंती समितीला देऊन संबधित बिल्डरला दुसरी पर्यायी जागा द्यावी, असे आदेश राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी 'पीएमआरडीए' चे आयुक्त राहुल महिवाल यांना दिले आहेत.**

पिंपरी-चिंचवड शहरात येताना भक्ती शक्ती समुहशिल्पालगतच्या पीएमआरडीएच्या जागेत शहरातील सर्वात मोठी युवप्रवर्तक छत्रपती शिवाजी महाराज यांची शिवजयंती, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीची भूखंड विक्री प्रक्रिया रद्द करून हा भूखंड जयंती उत्सव व इतर सर्व सार्वजनिक उपक्रमासाठी कायमस्वरूपी राखीव ठेवण्यात यावी. या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते मारुती भापकर यांच्या नेतृत्वाखाली आज समितीच्या वतीने थेरगाव येथे खासदार श्रीरंग आप्पा बारणे यांच्या मध्यस्थीने महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट समितीच्या वतीने घेण्यात आली. यावेळी शिष्टमंडळात मनसेचे शहराध्यक्ष सचिन चिखले, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सवचे अध्यक्ष संजय ससाने, काँग्रेस पक्षाचे नरेंद्र बनसोडे, शिवसेना ठाकरे गटाचे युवराज कोकाटे, कष्टकऱ्यांचे नेते काशिनाथ नखाते,शिवाजी साळवे मराठा सेवा संघाचे प्रकाश जाधव, छावा युवा महासंघाचे अध्यक्ष धनाजी यळकर पाटील, संभाजी ब्रिगेडचे अध्यक्ष सतीश काळे, भाउसाहेब अडागळे उपस्थित होते.



### मुख्यमंत्र्यांचा फैसला ऑन दी स्पॉट...

**यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पीएमआरडीचे आयुक्त राहुल महिवाल, मनपा आयुक्त शेखर सिंह, आमदार महेश लांडगे यांच्यासमोर मारुती भापकर यांनी मुख्यमंत्री महोदय आपण महात्मा बसवेश्वर पुतळ्याचे अनावरण जेथे करणारसाठी जाणार आहात त्या जागे लगत शहरातील सर्वात मोठी शिवजयंती, लोकशाहीर आण्णाभाऊ साठे जयंती पिंपरी चिंचवड महानगरपालिका व समितीच्या वतीने साजरी होते. या कार्यक्रमासाठी दरवर्षी आठ ते दहा हजार लोक उपस्थित असतात. तसेच ही जागा जगद्गुरु तुकाराम महाराज यांच्या पालखी मार्गाचा आहे. त्यावर मुख्यमंत्र्यांनी भापकर थांबवत मग झाले काय ? असा प्रश्न केला असता. भापकर यांनी मुख्यमंत्र्यांच्या शेजारी उभे असणारे राहुल महिवाल यांच्याकडे बोट दाखवून यांनी ही जागा लिलाव करून विक्री केली आहे. त्यामुळे आमच्या सर्व महापुरुषांचे कार्यक्रम बंद होणार आहेत. हा निर्णय रद्द करावा, इतर पर्याय विचार करून ही जागा कायमस्वरूपी राखीव ठेवावी, अशी आमची मागणी आहे. त्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी तत्काळ राहुल महिवाल यांना सर्व पर्यायांचा विचार करून संबधित बिल्डरास दुसरी जागा द्यावी आणि शिवजयंती जिथे साजरी होत होती तिथेच उत्साहाने साजरी होईल, यात सकारात्मक मार्ग काढावा असा आदेशच केला.**

---

# शासनाला माहिती देण्यास टाळाटाळ!

## आयुक्तांनी विभाग प्रमुखांना घेतले फैलावर

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने मागील वर्षभरात केलेली विकास कामे, राबविलेले नवीन उपक्रम याची माहिती राज्य सरकारला देण्यास टाळाटाळ करणाऱ्या विभागप्रमुखांना आयुक्त शेखर सिंह यांनी फैलावर घेतले.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेने मागील वर्षभरात केलेली विकास कामे, राबविलेले नवीन उपक्रम याची माहिती राज्य सरकारला देण्यास टाळाटाळ करणाऱ्या विभागप्रमुखांना आयुक्त शेखर सिंह यांनी फैलावर घेतले. दहा महिन्यापासून आपण काही गोष्टी बघत आहोत, यापुढे अशा बाबी खपवून घेणार नसल्याचा इशाराही त्यांनी दिला.

राज्यातील शिंदे-फडणवीस सरकारला ३० जून रोजी एक वर्ष पूर्ण होत आहे. यानिमित्त पिंपरी-चिंचवड महापालिकेत प्रशासकीय राजवटीत विविध विभागाच्या माध्यमातून नवीन उपक्रम, योजना, विकास कामांसह आदींची माहिती सरकारने आठ दिवसांपूर्वी मागितली आहे. त्यानुसार आयुक्त सिंह यांनी पालिकेच्या सर्व विभाग प्रमुखांनी आपल्या विभागात गेल्या वर्षभरात केलेल्या चांगल्या कामाची फोटोसह माहिती देण्याचे सांगितले. याबाबत विभाग प्रमुखांच्या ग्रुपमध्येही माहिती देण्यासाठी नमुना टाकण्यात आला होता. मात्र, अधिकाऱ्यांनी त्याकडे दुर्लक्ष केले.

# मालमत्ताकराच्या सवलती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी पिंपरी महापालिकेची 'रिल्स' स्पर्धा

। पिंपरी । महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व करसंकलन विभागाने मालमत्ताकराच्या सवलती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मीम्सनंतर आता 'रिल्स' स्पर्धेची शक्कल लढविली आहे.**



पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या कर आकारणी व करसंकलन विभागाने मालमत्ताकराच्या सवलती नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी मीम्सनंतर आता 'रिल्स' स्पर्धेची शक्कल लढविली आहे. फेसबूक, इन्स्टाग्राम, ट्विटर आदी समाजमाध्यमातून नागरिकांना कर भरण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येणार असून रिल्स बनविणाऱ्यांना बक्षिस दिले जाणार आहे.

सध्या रिल्सच्या माध्यमातून गाणी, विनोद, ग्राफिक्स यांच्याद्वारे सामाजिक संदेश देण्यात येतो. रिल्स माध्यम नागरिकांच्या पसंतीस उतरले आहे. चित्रपट, गाणी, संगीत यांचा आधार घेऊन नव्या संकल्पनेची निर्मिती आज नव्या पिढीकडून होत असल्याने, करसंकलन विभागाने या माध्यमातून कर भरण्याचे आवाहन करण्यासाठी स्पर्धेचे आयोजन केले आहे. प्रथम क्रमांकास पाच हजार, द्वितीय तीन हजार आणि तृतीय क्रमांक येणाऱ्याला दोन हजार रुपयांचे बक्षिस देण्यात येणार आहे. कलाकारांच्या रिल्सला पालिकेच्या समाजमाध्यमातून प्रसिद्धी देण्यात येणार आहे. कर संकलन विभागाने राबविलेल्या उपक्रमांमुळे आणि विविध सवलतींमुळे आजपर्यंत दोन लाखांवर मालमत्ता धारकांनी तब्बल १३ कोटी रुपयांच्या सवलतींचा लाभ घेतला आहे.




भूमिका
गौरव जाधव
91 88051 21395


**दहावी,बारावीच्या निकालानंतर नुकताच नीट परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. दोन वर्ष कोचिंग क्लासच्या चकरा मारूनही असे असंख्य विद्यार्थी आहेत की जे गुणांच्या बाबतीत शंभरावर सुद्धा जाऊ शकले नाहीत. नीट परीक्षेतील एकूण ७०० गुणांपकी जर शंभर आकडा जर कुणी गाठू शकत नसेल तर आगामी काळात करियरसाठी मार्ग बदलला पाहिजे हे कुणीही सहज सुचवेल मात्र पुन्हा त्याच घाण्याला मुलांना जुंपवून स्वतःच्या इच्छा लादणारे पालक समाजात कमी नाहीत.**

# व्यवसाय छोटा, पैसा मोठा!



काहीही करून मुलांना डॉक्टर करायचे आहे या जिद्दीने पेटलेले पालक स्वतःहून मुलांचे भविष्य खराब करायला निघालेले आहेत. आपले अपूर्ण स्वप्न कुटुंबातील इतर कुणावर लादता येत नाही त्यामुळे मुलांना बळीचे बकरे बनवले जात आहे. प्रत्येक मुलात स्वतःचे अंगभूत कलागुण असतात,आवडीनिवडी असतात ,एखादी विशिष्ट गोष्ट केल्याने त्याला अधिक आनंद वाटतो. विद्यार्थी दशेत अनेक कुटुंबात आपल्या आवडीचे क्षेत्र विद्यार्थी निवडू शकत नाहीत.

अपार्टमेंट मध्ये राहणारी कुटुंब स्वतःच्या मुलांनी काय करावे यापेक्षा शेजाऱ्याच्या मुलांनी काय केले त्याकडे अधिक लक्ष देत असतात आणि तसेच आपल्या मुलांनीही केले पाहिजे यासाठी दबाव आणतात. ज्या घरात मुलांचा पालकांशी सुदृढ संवाद होत नसतो त्या मुलांना अन्य कोणताही पर्याय नसल्याने पालक म्हणतील ते ऐकावे लागते,एखादी गोष्ट पटली नसली तरी पालकांच्या दबावापुढे मान डोलवावी लागते. पुढे असे विद्यार्थी अन्य पर्याय उपलब्ध होताच लादलेली बंधने झुगारून आवडीच्या क्षेत्रात करियर करतात. म्हणूनच शेतीच्या क्षेत्रात पोस्ट ग्रॅज्युएट झालेले अनेक लोक पोलीस अधिकारी पदावर काम करताना दिसतात. अनेक डॉक्टर पुढच्या आयुष्यात सनदी अधिकारी झालेले दिसतात ,त्याचे कारण पालकांच्या दबावात दडलेले असते. मुलांना स्वतःच्या आवडीनिवडी जोपासू द्या,तरच तुम्ही घेत असलेल्या परिश्रमाचे चीज होऊ शकेल.

दहावी,बारावीत जी मुले पन्नास साठ टक्क्याच्या पुढे जाऊ शकत नाहीत ,त्यांचे आयुष्य वाया जाते असे नाही ,अनेकदा याच वर्गातली मुले अभ्यासात प्रचंड हुशार असणाऱ्या मित्रांनाही मागे टाकत व्यापार,उद्योगात यशस्वी होत असतात. ज्यांचा लहान सहान व्यापार,अथवा व्यवसायात स्वारस्य असते त्यांचे न कळत कुटुंबीय पाय खेचत असतात. आपल्या मुलाने हा लहानसा व्यवसाय करावा काय ? या विचाराने पालक चिंतीत होतात. कारण मुलाने प्रतीष्ठेची नोकरी करावी असे त्यांना वाटत असते. प्रसंगी पन्नास लाख रुपये भरू पण मुलाला कुठेतरी परमनंट नोकरीत लावू असा पालकांचा अट्टहास असतो. या उलट जे पालक याच पन्नास लाखाचा लहानसा व्यवसाय मुलाला टाकून देतात ते अनेकदा नफ्यात असू शकतात. व्यवसाय जेवढा लहान असेल तेवढा त्यात नफा जास्त असण्याची शक्यता असते. ज्या व्यवसायात प्रतिष्ठा नाही पण पैसा असतो असे खूप व्यवसाय आहेत.

कोणताही व्यवसाय करण्याची लाज वाटायला नको कारण ज्या लोकांनी प्रारंभी लहान व्यवसाय केले ते अनेक लोक आजच्या घडीला कोट्यवधींच्या साम्राज्याचे मालक बनलेले आहेत. कोणत्याही शहराच्या मुख्य बाजार पेठेत चक्कर मारल्यावर एक लक्षात येते की रस्त्यावर हातगाडी किंवा छोटेसे दुकान लावून बसणारा समूह हा सहसा पॉट भरण्यासाठी बाहेरून आलेला असतो आणि त्याच शहरातील मूळ रहिवासी तरुण मात्र हाताला काम नाही म्हणून बेरोजगार अवस्थेत फिरत असतात. लोकांच्या दैनंदिन गरजा भागवणारी छोटी छोटी दुकाने सुरु करतांना मध्यमवर्गीयांना प्रतिष्ठा आडवी येते. डेली निडस ,दुधाचा व्यवसाय,भाजी,किराणा,किंवा हंगामी लहान व्यवसाय हे दिसायला छोटे असले तरी येणाऱ्या वर्षभराची कमाई करून देणारे असतात. चार पाच महिने विविध प्रकारचे आंबे विक्रीचा व्यवसाय सुद्धा उत्तम कमाई करून देणारा ठरू शकतो.

ज्या व्यवसायात प्रतिष्ठा नाही त्यात भरपूर पैसा आहे हे सूत्र जर लक्षात ठेवले तर माझ्या हाताला काम नाही अशी तक्रार करण्याची कुणालाही संधी मिळणार नाही मात्र प्रत्येकाला डोक्यावर पंखा आणि बसायला टेबल हवा असतो अश्या पदांची संख्या अत्यल्प आहे त्यासाठी मिळेल तो व्यवसाय करायला सुरुवात केली तर आर्थिक प्रश्न सुटून चार पैसे हातातही खेळायला लागतील आणि एकदा का हातात पैसा आला की प्रतिष्ठा आपोआप तुमच्या मागे धावायला लागेल. आजच्या घडीला मोठ्या शहरात प्लम्बर.वायरमन ,इलेक्ट्रिक उपकरणे दुरुस्ती,माळी ,घरपोच किराणा देणारा असे अनेक घटक लवकर मिळत नाहीत ,पदवी घेतलेले तरुण ते करायला धजावत नाहीत आणि वरून आपण बेरोजगार अहोत्याची दवंडी पिटायला सर्वात पुढे असतात हे चित्र प्रयत्न केल्यास बदलता येणे शक्य आहे , त्यासाठी प्रत्येकाने मनाशी हे ठरवले पाहिजे कीकोणताही धंदा छोटा किंवा अप्रतिष्ठित नाही मिळेल ते काम मला करावे लागेल.

## संपादकीय »

### प्रवेश वायाच?

***आपल्या पाल्याला काय जमेल, किंवा काय नक्की जमणार नाही, याचा विचारही न करता, अनेक जण ज्या मार्गाने चालले आहेत, तोच मार्ग निवडण्याची पालकांची सवय आता किमान तीन दशके जुनी झाली आहे...***

अभियांत्रिकीची 'जेईई' किंवा वैद्यकीय प्रवेशांची 'नीट' या परीक्षा पार केल्या तरीही पुढले निर्णय विद्यार्थ्यांना घ्यावे लागतात. वैद्यकीय पदवीलाच व्यवसाय करण्याएवढी तरी किंमत एके काळी असे. आता त्यातही विशेष प्रावीण्याला महत्त्व आल्याने एमबीबीएसनंतर काय, हा प्रश्न असतो. अभियांत्रिकी या एका शब्दात तर अनेक विद्याशाखा अडकलेल्या असल्याने पुन्हा काय करावे, हा यक्षप्रश्न उभा राहतोच. सर्वांना 'आयआयटी'- राष्ट्रीय प्रौद्योगिकी संस्था- हवी असते. मुळात 'जेईई मेन' परीक्षा असो की एकेका ठिकाणच्या आयआयटीसाठी जेईई ॲडव्हान्स्डसारखी परीक्षा- येथे लाखो मुलामुलींमधून काही हजार मुलांना यश मिळते, तेव्हा त्यांनी काही ना काही ध्येय ठरवलेले असणारच, असे मानण्यास जागा आहे. काही जण स्थापत्य अथवा यंत्र- अभियांत्रिकीचा अभ्यासक्रम निवडतात. असेही करून पुढे काय होते?

**निवृत्तीनंतरचे न्यायमूर्तींचे वर्तन हे न्यायसंस्थेवरील नागरिकांचा विश्वास दृढ होण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. खरे तर सर्वोच्च न्यायालयानेच निवृत्त न्यायमूर्तींसाठी आचारसंहिता तयार केली पाहिजे...**

## निवृत्तीपश्चात विश्वासार्हता!

गेल्या पाच वर्षात सर्वोच्च न्यायालयातील निवृत्त झालेल्या २१ टक्के न्यायमूर्तींनी अनेक पदांवर नियुक्त्या स्वीकारल्या. न्या. एस. अब्दुल नझीर यांची आंध्र प्रदेशाचे राज्यपाल म्हणून, न्या. हेमंत गुप्ता यांची आंतरराष्ट्रीय मध्यस्थता केंद्राचे अध्यक्ष, न्या. अरुणकुमार मिश्रा यांची राष्ट्रीय मानवाधिकार आयोग अध्यक्ष, न्या. आदर्शकुमार गोयल यांची नॅशनल ग्रीन ट्रिब्युनल अध्यक्ष, तर न्या. अशोक भूषण यांची राष्ट्रीय कंपनी कायदा आपिलीय न्यायाधिकरण अशा नेमणुका झाल्या. सरन्यायाधिश रंजन गोगई यांची राज्यसभेवरील नियुक्ती साऱ्यांच्या भुवया उंचावणारी होती. निवृत्त झाल्यावर ते चार महिन्यांत राज्यसभेवर गेले. अशा नियुक्त्या कार्यकारी आणि न्यायपालिका यामधील रेषा अस्पष्ट करतात आणि न्यायमूर्तींच्या पावित्र्याभोवती संशयाचे धुके निर्माण करतात. यामुळेच न्यायव्यवस्थेचे स्वातंत्र्य रडारवर आले. 'न्याय फक्त झाला पाहिजे असे नाही, तर होतानाही पाहीले पाहीजे,' हे लॉर्ड हेवर्ट यांचे मत कायम लक्षात ठेवण्याची गरज आहे. अशा नेमणुकांमुळे सर्वसाधारणपणे न्यायमूर्तींनी त्यांच्या काळात सरकारच्या बाजूने दिलेल्या निकालावर शंका घेतली जाते. न्यायव्यवस्थेच्या स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यासाठी घटनाकारांनी विशेष काळजी घेतली. अशा वेळी कार्यकारी यंत्रणेचा प्रभाव राहणार नाही व सर्व निकाल स्वतंत्रपणे होतील, ही अपेक्षा होती. न्या. एस. फझल अली हे सर्वोच्च न्यायालयाचे पहिले न्यायमूर्ती होते, जे १९५२ साली निवृत्तीनंतर एका आठवड्यात ओडिशाचे राज्यपाल



झाले. १९७५ मध्ये न्या. जगमोहन सिन्हा यांनी राजनारायण वि. इंदिरा गांधी यांच्या निवडणूक भ्रष्टाचाराच्या खटल्याचा निकाल दिला. सरतेशेवटी इंदिरा गांधींनी देशात आणीबाणी जाहीर केली. १९७६ मध्ये न्यायमूर्ती ए. एन. रे यांनी शिवकांत शुक्ला विरुद्ध एमडीएम जबलपूर या खटल्यात नागरिकांचे सर्व मूलभूत अधिकार रद्द केले. त्या घटनापीठात स्वतंत्र बुद्धीचे न्यायमूर्ती एच. आर. खन्ना होते. अर्थात न्या. खन्ना यांची जेष्ठता व अनुभव असताही त्यांना डावलून जेष्ठतेमध्ये मागे असलेले न्या. एम. एच. बेग यांना देशाचे सरन्यायाधिश बनवले गेले. याच न्या. बेग यांना निवृत्तीनंतर नॅशनल हेरॉल्ड या वृत्तपत्राचे संचालक बनवले. त्यानंतर त्यांची अल्पसंख्याक आयोगाच्या अध्यक्षपदी नियुक्ती झाली.

## ||अभंगवाणी ||



अडकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥
**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

## मागील पाच महिन्यांत मराठवाड्यात 391 शेतकऱ्यांची आत्महत्या

# शेतकरी आत्महत्येची धक्कादायक आकडेवारी!

### शिंदे-फडणवीस सरकारचा दावा फोल

।छत्रपती संभाजीनगर । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**अवकाळी पाऊस, शेतीचे नुकसान, आर्थिक विवंचना या गर्तेत अडकलेल्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी सरकारस्तरावर अनेक प्रयत्न केले जात असल्याचा दावा अजूनही फोल ठरत असल्याचे दिसून येत आहे. मागील पाच महिन्यांत मराठवाड्यात ३९१ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे विभागीय आयुक्तालयाच्या अहवालातून उघड झाले आहे. त्यात आता पावसाने ओढ दिल्याने सरकारी यंत्रणा, राज्य सरकारसमोर आत्महत्या सत्र रोखण्याचे मोठे आव्हान उभे राहणार आहे.**

विभागीय आयुक्तालयातून प्राप्त अधिकृत आकडेवारीनुसार, १ जानेवारी ते ३१ मे २०२३ या पाच महिन्यांत मराठवाड्यात ३१९ शेतकरी आत्महत्या झाल्या आहेत. त्यात बीड जिल्ह्यात सर्वाधिक ९८, त्या खालोखाल धाराशीव जिल्ह्यातील ८० शेतकऱ्यांचा समावेश आहे. गेल्या वर्षी मराठवाड्यातील बहुतांश जिल्ह्यात अतिवृष्टीचा फटका बसला. त्यामुळे अर्ध्याहून अधिक मराठवाड्यामध्ये खरिपाचे पीक हातचे गेले होते. काही ठिकाणी दुबार पेरणी केल्यानंतर जास्तीच्या पावसाचा फटका बसला होता. सरकारने शेतकऱ्यांना मदतीची घोषणा केली. मात्र, अजून दोन वर्षांपूर्वीच्या नुकसानीचीच रक्कम अनेक शेतकऱ्यांना अद्याप मिळालेली नाही. त्यात गेल्या वर्षीच्या शेती नुकसानीची भर पडली. विमा कंपन्यांकडूनही अपेक्षित प्रतिसाद मिळाला नसल्याचे सूत्रांनी सांगितले. शेतकऱ्यांना मे अखेरपर्यंत वीकविम्याचे पैसे मिळतात; पण यंदा शेतकरी त्यापासून वंचित आहेत. अवकाळी व गारपिटीमुळे रबी हंगामातील पिकांनाही मोठा फटका बसला होता.



### 98 प्रकरणांची चौकशी सुरू

आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याच्या वारसाला सरकारकडून सानुग्रह अनुदानापोटी एक लाखाची मदत करण्यात येते. मराठवाड्यातील २३६ शेतकरी सरकारच्या या निकषात बसत असल्याने या शेतकऱ्यांच्या वारसांना अनुदानाची रक्कम प्रदान करण्यात आली. सुमारे ५७ शेतकऱ्यांच्या वारसांना मात्र निकषात बसत नसल्याने मदत करण्यात नकार देण्यात आला. ९८ प्रकरणांची चौकशी महसूल व पोलिस विभागाकडून सुरू असल्याचे विभागीय आयुक्तालयातील सूत्रांनी सांगितले.

### कोणत्या जिल्ह्यात किती शेतकऱ्यांनी मृत्यूला कवटाळले?

| | |
|---|---|
| छत्रपती संभाजीनगर | ५० |
| जालना | २५ |
| परभणी | ३२ |
| हिंगोली | १३ |
| नांदेड | ६५ |
| बीड | ९८ |
| लातूर | २८ |
| धाराशिव | ८० |

---

## “शिंदे गटाने ‘जागतिक गद्दार दिन’ साजरा करावा”, वर्धापन दिनावरून आदित्य ठाकरेंचा हल्लाबोल!

।मुंबई ।महाईन्यूज

१९ जून हा शिवसेनाचा वर्धापन दिन आहे. शिवसेनेत बंडखोरी झाल्यानंतर पक्षात दोन गट पडले आहे. बंडखोरी झाल्यानंतर शिवसेनेचा हा पहिलाच वर्धापन दिन असणार आहे. वर्धापन दिनानिमित्त दोन्ही गटाकडून जोरदार तयारी केली जात आहे. याच पार्श्वभूमीवर शिंदे गटाने वर्धापन दिनाचा टीझरही लॉन्च केला आहे. दरम्यान, ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे यांनी शिंदे गटावर जोरदार टीकास्त्र सोडलं.

शिंदे गटाने वर्धापन दिन साजरा करण्यापेक्षा ‘जागतिक गद्दार दिन’ साजरा करावा, असा खोचक सल्ला आदित्य ठाकरे यांनी दिला. शिंदे गटाच्या गद्दारीची नोंद जगातील ३३ देशांनी घेतली आहे. त्यामुळे त्यांनी ‘जागतिक गद्दार दिन’ साजरा करून, त्यांनी किती निर्लज्जपणे गद्दारी केली होती, हे लोकांना दाखवून द्यावं, अशा शब्दांत आदित्य ठाकरेंनी टीकास्त्र सोडलं.

दोन्ही गटाकडून वर्धापन दिनाच्या सुरू असलेल्या तयारीबाबत विचारलं असता



आदित्य ठाकरे म्हणाले, “वर्धापन दिन आम्हीच साजरा करणार आहोत. दुसरीकडे ज्यांची हकालपट्टी झाली आहे. सगळीकडून ‘रिजेक्ट’ झालेला माल आमचा वर्धापन दिन कसा काय साजरा करू शकतो. त्यांनी (शिंदे गट) ‘जागतिक गद्दार दिन’ साजरा करावा. कारण जगातील ३३ देशांनी त्यांच्या गद्दारीची नोंद घेतली आहे. तोच दिवस त्यांनी साजरा करावा. त्यांनी किती निर्लज्जपणे गद्दारी केली, हे त्यांनी लोकांना दाखवून द्यावं.” खरं तर, (रविवारी) वरळीत ठाकरे गटाचं राज्यव्यापी शिबीर आहे. या शिबिराची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. या शिबिराला उद्या राज्यभरातून अनेक शिवसैनिक आणि पदाधिकारी दाखल होणार आहेत.

## चंद्रशेखर बावनकुळेंचं एक वक्तव्यामुळे भाजपसह शिवसेनेच्या गोटातही खळबळ

### निवडणूक प्रमुखांना संभाव्य उमेदवार असल्याचे सूचित केल्याने अस्वस्थता

। पुणे ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीयभारतीय जनता पक्षाचा आमदार तसेच खासदार नसलेल्या मतदारसंघाच्या निवडणूक प्रमुखपदी 'यशस्वी नेत्यां'ची नियुक्ती केल्याचा दावा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी केल्याने भाजपमधील इच्छुकांमध्ये खळबळ उडाली आहे. प्रदेशाध्यक्षांनी या निवडणूक प्रमुखांना अप्रत्यक्षपणे संभाव्य उमेदवार असल्याचे सूचित केल्याने या मतदारसंघांतील इतर इच्छुकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे.**

लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघाच्या निवडणूक प्रमुखपदी नियुक्त करण्यात आलेले नेते हेच आगामी निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचे संभाव्य उमेदवार ठरू शकतील, असे पक्षाचे बावनकुळे यांनी पुण्यात शनिवारी सूचित केले. शिवाजीनगर



मतदारसंघात आयोजित भाजप पदाधिकाऱ्यांच्या 'टिफीन बैठकी'त बावनकुळे बोलत होते. 'भारतीय जनता पक्षाचा आमदार नसलेल्या मतदारसंघासाठी 'यशस्वी नेत्यां'ची नियुक्ती करण्यात आली आहे,' असे वक्तव्य बावनकुळे यांनी केले. 'पुढचे यशस्वी नेते' असा उल्लेख केलेले पदाधिकारी आमदारकीचेच उमेदवार असल्याचा अर्थ काढून पक्षात चर्चा सुरू झाली आहे. एकीकडे संभाव्य उमेदवार आधीच निश्चित झाल्यास त्यांना संपर्काला वेळ मिळेल, असे समर्थन यादीतील नेत्यांकडून करण्यात येत आहे, तर दुसरीकडे हे निवडणूक प्रमुखच संभाव्य उमेदवार असतील, तर इतरांनी काय करायचे, असा सवाल या यादीत नसलेल्या इच्छुकांकडून करण्यात आला आहे.

पुढील वर्षी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर भाजपने राज्यातील लोकसभा आणि विधानसभेच्या सर्व मतदारसंघांसाठी निवडणूक प्रमुखांची आठ जून रोजी नियुक्ती केली आहे.

### नेहमीच्या पद्धतीला कात्रजचा घाट?

कोणत्याही निवडणुकीत उमेदवार निश्चित करण्यासाठी भारतीय जनता पक्षात पूर्वीपासूनची पद्धत आहे. स्थानिक नेत्यांकडून प्रत्येक मतदारसंघातील संभाव्य उमेदवारांची नावे निवड मंडळाकडे पाठविण्यात येतात आणि पक्षाकडून अंतिम उमेदवार यादी जाहीर होते. आगामी निवडणुकीसाठीही पक्षात इच्छुकांची संख्या मोठी असून सर्वच मतदारसंघांमध्ये एकाहून अधिक इच्छुक आहेत. परंतु, प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्यासारखा वरिष्ठ नेता अप्रत्यक्षपणे संभाव्य उमेदवारांची नावे सूचित करू लागल्याने या पद्धतीलाच कात्रजचा घट दाखवण्यात येणार काय, असा सवाल एका इच्छुकाने केला.

### मग शिवसेनेचे काय?

भाजपने राज्यातील सर्व मतदारसंघांमध्ये निवडणूक प्रमुखांची नावे जाहीर केली आहेत. त्या पार्श्वभूमीवर बावनकुळे यांच्या विधानानुसार हेच संभाव्य उमेदवार असतील, तर राज्यात सत्तेत सोबत असलेल्या शिवसेनेच्या शिंदे गटाला किती आणि कोणत्या जागा मिळणार, असा प्रश्न निर्माण झाला आहे. काही दिवसांपूर्वी बावनकुळे यांनीच आगामी निवडणुकीत भाजप २४० जागा लढविणार असल्याचे जाहीर केल्याने शिंदे गटाच्या नेत्यांनी त्याला जोरदार आक्षेप घेतला होता.

# नील नितीन मुकेश प्रेमात झाला होता वेडा, दीपिकाच्या घरासमोर 3 तास...

बॉलिवूड अभिनेता नील नितीन मुकेश, ज्याला नील माथूर या नावानेही ओळखले जाते. 2007 मध्ये आलेल्या 'जॉनी गद्दार' चित्रपटातून त्याने मुख्य अभिनेता म्हणून पदार्पण केले. हा चित्रपट श्रीराम राघवन यांनी दिग्दर्शित केला होता. यानंतर तो इतरही अनेक चित्रपटांमध्ये दिसला पण तो कधीही ए-लिस्ट स्टार बनू शकला नाही.


नील नितीन मुकेशची कारकीर्द रोलर कोस्टरसारखी राहिली आहे. पण त्याच्या चर्चा खूप गाजल्या. शाहरुख खान आणि सैफ अली खानचा जाहीर अपमान असो किंवा दीपिका पदुकोणच्या घराबाहेर ३ तास उभे राहणे असो. आज त्यांच्या 41 व्या वाढदिवसानिमित्त आम्ही तुम्हाला असाच एक मजेशीर किस्सा सांगणार आहोत.

नील नितीन मुकेशने 'विजय' (1988) आणि 'जैसी करनी वैसी भरनी' (1989) मध्ये बालकलाकार म्हणून काम केले आहे. त्याचा पहिला चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपयशी ठरला. मात्र, त्याच्या अभिनयाचे नक्कीच कौतुक झाले. त्यानंतर या अभिनेत्याने सुधीर मिश्रा यांच्या 'तेरा क्या होगा जॉनी', 'न्यूयॉर्क', 'आ देखें जरा' सारख्या चित्रपटांमध्ये काम केले आणि प्रेक्षकांमध्ये छाप पाडली. 2010 मध्ये त्याचा एक चित्रपटही आला होता, 'लफंगे परिंदे' ज्यामध्ये तो दीपिका पदुकोणसोबत रोमान्स करताना दिसला होता.

या सिनेमाच्या शूटिंगदरम्यान दीपिका आणि नीलची जवळीक वाढली होती आणि ही बातमी खूप व्हायरल झाली होती. याची चर्चा प्रसारमाध्यमांमध्ये होऊ लागली. दीपिका आणि नीलचे अफेअर असल्याच्या बातम्या येऊ लागल्या. दोघेही डेटिंग करत आहेत. इतकंच नाही तर खुद्द अभिनेत्याने एकदा याबाबतचे संकेत दिले होते.त्यावेळी त्याने एक ट्विट केले. त्यात लिहिले होते – 'मी काल तीन तास लाल गुलाब घेऊन दीपिकाच्या दाराबाहेर उभा होतो. नंतर माझ्या लक्षात आले की ती आरक्षणाच्या आरक्षणसाठी गेली असावी'. मिळालेल्या माहितीनुसार, नील नितीन मुकेशने एका वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीदरम्यान सांगितले होते, 'ती माझ्या ओळखीच्या सर्वात गोड लोकांपैकी एक आहे. ती माझ्या कुटुंबासारखी आहे. माझी 4 वाजताची मैत्रीण आहे...



# तोंड लपवत अमिषा पटेल पोहचली कोर्टात, 5 वर्ष जुनं प्रकरण आलं अंगाशी





मुंबई- सकीना आणि तारा सिंग यांचा 'गदर २' हा चित्रपट येत्या ११ ऑगस्टला प्रदर्शित होणार आहे. मात्र त्याआधीच अमिषा पटेल रांचीच्या दिवाणी न्यायालयात हजर झाली होती. तेव्हा तिने दुपट्ट्याने आपला चेहरा लपवला होता. पण आता तिला पुन्हा एकदा यायचे आहे. न्यायालयाने तिला २१ जून रोजी पुन्हा हजर राहण्याचे निर्देश दिले आहेत. तिच्याविरोधात वॉरंट जारी करण्यात आले होते. त्यानंतर ती आज १७ जून रोजी न्यायालयात पोहोचली. आता १० हजार रुपयांच्या बॉण्डवर तिचा जामीन मंजूर करण्यात आला आहे. पण २१ तारखेला ती आली नाही तर तो रद्दही होऊ शकतो.

हे प्रकरण २०१८ सालचे आहे. अभिनेत्री अमिषा पटेलवर अडीच कोटींच्या फसवणुकीचा आरोप होता. रांचीच्या अजय कुमारने चेक बाऊन्स, फसवणूक आणि धमकावल्याचा आरोप अभिनेत्रीवर केला होता. एवढेच नाही तर अभिनेत्रीसह तिचा बिझनेस पार्टनर कुणालवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अजय झारखंडचा निर्माता आहे. 'देसी मॅजिक' चित्रपट बनवण्याच्या नावाखाली अमिषा पटेलने आपल्याकडून अडीच कोटी रुपये घेतल्याचा दावा त्याने केला होता. चित्रपट पूर्ण झाल्यावर ती व्याजावर परत करेल असेही सांगितले होते.

# '..तरच चरित्रपट यशस्वी होतो'



ि हं दू ी

चित्रपटसृष्टीप्रमाणे मराठी चित्रपटसृष्टीतही चरित्रपट साकारले जात आहेत. अभिनेते, राजकीय व्यक्ती किंवा मग इतिहासातील व्यक्तिरेखा अशा विविध क्षेत्रांतील दिग्गजांचे जीवन आपल्या अभिनय आणि दिग्दर्शकीय कौशल्यातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न मराठी चित्रपटसृष्टीतील कलाकार मंडळी करत आहेत. मराठीतील गाजलेल्या चरित्रपटांच्या यादीत 'धर्मवीर' या चित्रपटाचे नाव सध्या अग्रणी आहे. या चित्रपटात धर्मवीर आनंद दिघे यांची भूमिका साकारून अभिनेता प्रसाद ओक याने त्याच्यातील अभिनय कौशल्याची नवी बाजू प्रेक्षकांसमोर मांडली. त्याने साकारलेल्या या भूमिकेला महाराष्ट्रभरातून भरभरून प्रतिसाद मिळाला. गाजलेल्या व्यक्तीची भूमिका साकारल्यानंतर प्रसाद ओक पडद्याआड असलेल्या एका सामान्य व्यक्तीची असामान्य गोष्ट मोठ्या पडद्यावर उलगडणार आहे. 'परिनिर्वाण' सारखे चित्रपट वारंवार होत नाहीत आणि प्रत्येक कलाकाराला पुन्हा पुन्हा इतक्या अभिनयाच्या दृष्टीने ताकदशीर भूमिका मिळत नाहीत. अभिनय, दिग्दर्शन, कथा सगळ्याच बाबतीत विविध कंगोरे असलेल्या 'परिनिर्वाण' या चित्रपटाचा मी एक भाग असल्याचा मला अभिमान आहे, असं प्रसाद सांगतो. 'दिग्दर्शक आणि कलाकार म्हणून मला एखाद्या काळात रमायला आवडतं. परिनिर्वाण हा शब्द ऐकल्यानंतर पहिल्यांदा माझ्या मनात आलं की हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनाशी निगडित किंवा त्यांच्या महापरिनिर्वाणासंदर्भातील चित्रपट आहे का? परंतु प्रत्यक्षात चित्रपटाचे कथानक हे बाबासाहेबांचे परिनिर्वाण कॅमेऱ्यात कैद करणाऱ्या व्यक्तीच्या जीवनावर आधारित आहे हे समजलं तेव्हा किती वेगळ्या विषयावरचा चित्रपट आहे दिग्दर्शक आणि लेखकाने या विषयासाठी जी मेहनत घेतली आहे तीही लोकांपर्यंत पोहोचली पाहिजे हा एक भाग होता आणि दुसरं म्हणजे महामानवाचे परिनिर्वाण कसे होते ते पुढच्या अनेक पिढ्यांनाही कळले पाहिजे. त्यासाठी तो प्रसंग जतन झाला पाहिजे हा विचार मुळात ज्यांच्या मनात आला त्या नामदेव व्हटकरांची ओळखही लोकांना व्हायला पाहिजे हाच एक ध्यास मनात आहे' असे प्रसादने सांगितले.

# "अभिनय क्षेत्रात काम मिळविण्यासाठी...," ऋता दुर्गुळेने

'फुलपाखरू' या मालिकेतून छोट्या पडद्यावर पदार्पण करणारी ऋता दुर्गुळे आज मराठी मनोरंजन सृष्टीतील लोकप्रिय अभिनेत्री म्हणून ओळखली जाते. तिचं नाव मराठीतील आघाडीच्या अभिनेत्रींच्या यादीत सामील आहे. तिचा चाहता वर्गही प्रचंड मोठा आहे. सोशल मीडियावर सर्वाधिक फॉलोवर्स असणाऱ्या मराठी मनोरंजन सृष्टीतील अभिनेत्रींच्या यादीत ऋताचं नाव पहिल्या क्रमांकावर आहे. पण काम मिळवण्यासाठी फॉलोवर्स महत्वाचे नसतात असं भाष्य तिने केलं आहे. हल्ली सोशल मीडियावर आपले फॉलोवर्स जास्त असावे यासाठी अनेकजण प्रयत्न करताना दिसतात. तसंच आपले फॉलोवर्स जास्त असले की आपल्याला कामही मिळायला मदत होते असंही मनोरंजन सृष्टीत काम करू इच्छिणाऱ्या काहींना वाटतं. मात्र आता ऋताने यावर तिचं मत मांडलं आहे. अभिनय क्षेत्रात काम मिळवण्यासाठी कोणती गोष्ट सर्वात जास्त महत्त्वाची आहे हे तिने सांगितलं आहे.



# ऑस्ट्रेलियाचे गर्वहरण: इंग्लंडने रचला इतिहास!

## क्रिकेटच्या 146 वर्षांत असं कधीच घडलं नाही

।नवी दिल्ली।

महाईन्यूज ।वृत्तसंस्था।

**आशिया क्रिकेटच्या इतिहासात आतापर्यंत जी गोष्ट घडली नव्हती ती आता १४६ वर्षांनी पहिल्यांदाच पाहायला मिळाली आहे. इंग्लडने ऑस्ट्रेलियाचे गर्वहरण करत कोणता पराक्रम केला आहे.इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात अॅशेस कसोटी मालिका सुरु झाली आहे. या मालिकेचा पहिला सामना सध्याच्या घडीला बर्मिंगहममध्ये सुरु झाला आहे. या कसोटी सामन्याच्या पहिल्याच दिवशी इंग्लंडने वर्चस्व राखल्याचे पाहायला मिळाले.**



आतापर्यंत क्रिकेटच्या इतिहासात जी गोष्ट आतापर्यंत कधीच घडली नव्हती ती इंग्लंडने करत इतिहास रचला आहे. सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे भारताला पराभूत करून विश्व अजिंक्यपद स्पर्धेचे जेतेपद पटकावणाऱ्या ऑस्ट्रेलियाचे ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजीचा इंग्लंडने यावेळी चांगलाच समाचार घेतला आणि पहिल्याच दिवशी त्यांना जमिनीवर आणले. इंग्लंडने पहिल्याच दिवशी आपला पहिला डाव घोषित करत सर्वांना धक्का दिला आहे. त्याचबरोबर इंग्लंडने यावेळी कसोटी क्रिकेटमध्ये असा एक इतिहास रचला आहे. आतापर्यंत १४६ वर्षांच्या क्रिकेटच्या इतिहासात ही गोष्ट यापूर्वी कधीच घडली नव्हती.

इंग्लंडने पहिल्या दिवशी आपला डाव घोषित केला. ही गोष्ट इंग्लंडने दुसऱ्यांदा केली आहे. एकाच वर्षात दोनवेळा पहिल्याच दिवशी आपला डाव घोषित करणारा इंग्लंडचा हा क्रिकेट विश्वातील पहिलाच संघ ठरला आहे. आतापर्यंत क्रिकेटच्या इतिहासात एकाच वर्षात दोनवेळा आपला पहिला डाव पहिल्याच दिवशी घोषित कोणत्याही संघाला करता आला नव्हता. पण इंग्लंडने ही गोष्ट मात्र करून दाखवली आहे. आतापर्यंत क्रिकेट विश्वात दक्षिण आफ्रिकेनेही दोनवेळा पहिल्या दिवशी पहिला डाव घोषित केला आहे. पण एका वर्षात त्यांनी ही गोष्ट केलेली नाही ती फक्त इंग्लंडलाच जमलेली आहे. त्याचबरोबर पाकिस्तान आणि ऑस्ट्रेलिया यांनी आपला पहिला डाव पहिल्या दिवशी घोषित करण्याचा पराक्रम एकदा केलेला आहे. पण इंग्लंडने मात्र एकाच वर्षात दोनवेळा हा पराक्रम करत आता क्रिकेटच्या १४६ वर्षांमध्ये ही गोष्ट प्रथमच करून दाखवली आहे.

अयोध्येतील काकांचे क्रिकेट प्रेम, कुटुंबाला व्हिडिओ कॉलवर दाखवली भारतीय संघाची नेट प्रॅक्टीस

क्रिकेटच्या १४६ वर्षांच्या इतिहासात कोणालाच जी गोष्ट जमली नव्हती ती आता इंग्लंडने करून दाखवली आहे. त्यामुळे आता या मालिकेत काय होतं, याची उत्सुकता सर्वांनाच लागलेली असेल.

### ऑस्ट्रेलियाला इंग्लंडने आणले जमिनीवर

ऑस्ट्रेलियाने WTC FINAL मध्ये दणदणीत विजय मिळवला होता. या यशानंतर ऑस्ट्रेलियाचा संघ हवेत होता. पण त्यांना जमिनीवर आणण्याचे काम आता इंग्लंडच्या संघान चोख बजावले आहे. सामन्याच्या पहिल्याच दिवशी जो रुटने शतक करत ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजीचे कच्चे दुवे सर्वांसमोर आणले आहेत. इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात आज अॅशेस मालिकेला सुरुवात झाली. पण या सामन्याच्या पहिल्याच दिवशी इंग्लंडने ऑस्ट्रेलियाचा गोलंदाजीचा चांगलाच समाचार घेतला. इंग्लंडने टॉस जिंकला आणि त्यांचा कर्णधार बेन स्टोक्सने प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. स्टोक्सचा हा निर्णय किती योग्य होता हे इंग्लंडच्या फलंदाजांनी पहिल्याच दिवशी दाखवून दिले. ऑस्ट्रेलियाच्या गोलंदाजीचा त्यांनी खरपूस समाचार घेतला आणि कसोटीमध्ये वनडे स्टाइल फलंदाजीचा नमुना त्यांनी पेश केला. इंग्लंडला बेन बकेटच्या रुपात २२ धावांवर असताना पहिला धक्का बसला. पण त्यानंतर सलामीवीर झॅक क्रॉवली आणि ऑली पोप यांनी दमदार फलंदाजी केली. या दोघांनी दुसऱ्या विकेटसाठी ७० धावांची भागदारी रचली. पण त्यानंतर ऑलीला नॅथन लायनने बाद केले आणि इंग्लंडला दुसरा धक्का बसला. त्यानंतर क्रॉवलीने आपले अर्धशतक पूर्ण केले, पण त्यानंतर तो जास्त काळ खेळपट्टीवर टीकू शकला नाही. क्रॉवलीने यावेळी ६२ धावा केल्या. क्रॉवली बाद झाला पण त्यानंतर रुटची दमदार फलंदाजी पाहण्याचा योग चाहत्यांना आला.

---

## सहा चेंडूंत सहा विकेट्स घेत खेळाडूने रचला इतिहास



।लंडन ।

महाईन्यूज ।वृत्तसंस्था।

क्रिकेट विश्वात आता एक सुवर्ण अक्षरांनी इतिहास लिहिला गेला आहे. कारण आतापर्यंत एका षटकात सहा विकेट्स कोणीही मिळवल्या नव्हत्या. पण या एका खेळाडूने मात्र एका षटकात सहा विकेट्स मिळवत इतिहास रचला आहे. कारण यापूर्वी अशी कामगिरी कोणत्याही खेळाडूला करता आली नव्हती. पण आता ही गोष्ट पाहायला मिळाली आहे. ही गोष्ट नेमकी कोणती केली आहे, याची उत्सुकता सर्वांनाच आहे. त्यामुळे आता हा विक्रम रचणाऱ्या खेळाडूचे नाही आता जगजाहीर झाले आहे.

बारा वर्षीय ऑलिव्हर व्हाईटहाऊसने सहा चेंडूंत सहा विकेट घेण्याचा पराक्रम केला. त्याने डबल हॅटट्रिक घेताना दोन षटकांत एकूण आठ फलंदाज बाद केले. ब्रॉम्सग्रोव्ह क्रिकेट क्लबकडून खेळणाऱ्या ऑलिव्हरने कूकहिल संघाचे सहा फलंदाज एका षटकांत बाद केले. त्याने आठ फलंदाज एकही धाव न देता बाद केले. एका षटकात डबल हॅटट्रिक झाली यावर माझा विश्वासच बसला नाही.

## अन् शाहिद आफ्रिदी भडकला!

### भारतात होणाऱ्या World Cup बाबत व्यक्त केली नाराजी

।नवी दिल्ली ।

महाईन्यूज ।वृत्तसंस्था।

**भारतामध्ये आता ODI WORLD CUP होणार आहे आणि पाकिस्तानने या स्पर्धेसाठी आपला होकार कळवला आहे. त्यामुळे आता पाकिस्तान हा विश्वचषक खेळण्यासाठी भारतात येणार आहे. पण आता या विश्वचषकाबाबत पाकिस्तानचा माजी कर्णधार शाहिद आफ्रिदी भडकल्याचे पाहायला मिळाले आहे.**



आफ्रिदी जेव्हा पाकिस्तानचा कर्णधार होता तेव्हाही भारतामध्ये विश्वचषक झाला होता आणि त्यावेळी पाकिस्तानचा संघ भारतामध्ये खेळण्यासाठी आला होता. २०११ साली झालेल्या विश्वचषकात भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना कोणीही विसरू शकणार नाही. कारण या सामन्यात भारताने पाकिस्तानला पराभूत केले होते आणि त्यांनी अंतिम फेरीत दिमाखात प्रवेश केला होता. त्यामुळे हा सामना कोणीही विसरू शकणार नाही. आता पुन्हा एकदा भारत आणि पाकिस्तान यांच्यात या विश्वचषकात सामना होणार आहे. हा सामना अहमदाबादमध्ये होणार असल्याचे संकेत मिळत आहेत, पण पाकिस्तानचा मात्र या ठिकाणाला विरोध आहे.

आफ्रिदी यावेळी म्हणाला की," भारत आणि पाकिस्तान यांच्यातील वनडे विश्वचषकातील सामना हा अहमदाबाद येथे खेळवण्यासाठी बीसीसीआय प्रयत्नशील आहे. पण पाकिस्तानने मात्र या गोष्टीला विरोध केला आहे. मला पाकिस्तान क्रिकेट मंडळाची एक गोष्ट कळत नाही, ती म्हणजे अहमदाबादच्या खेळपट्टीला ते एवढे का घाबरत आहेत. अहमदाबादच्या खेळपट्टीमधून काही आग येते का? अहमदाबादची खेळपट्टी घाबरवणारी आहे का? खेळायला जायचं आणि जिंकून यायचं, हेच संघाने करायचं असतं. पाकिस्तानच्या क्रिकेट मंडळाने या गोष्टीला सकारात्मकपणे घेतले पाहिजे. सर्वात महत्वाचे काय आहे, तर विजय मिळवणे. पाकिस्तानने या सामन्यात विजय मिळवला तर नक्कीच या गोष्टी महत्वाच्या ठरणार नाहीत. त्यामुळे माझ्यामते तरी पाकिस्तानने या गोष्टीला विरोध करू नये." या विश्वचषकात भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना गुजरातला होऊ शकतो, असे म्हटले जात आहे. पण आता आफ्रिदीने स्पष्टपणे त्याची भूमिका मांडली आहे. त्यामुळे आता पाकिस्तानचे क्रिकेट मंडळ काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असेल.